*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

# निवडणुक अंदाजशास्त्र

**डॉ. सय्यदा अनिस फतेमा**
प्राचार्य
डॉ. रफ़िक़ झकारिया कॉलेज फॉर वूयमेन
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

**उज्वला बागुल**
संशोधक
राज्यशास्त्र विभाग
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

**डॉ. सय्यद मुज्तबा कादरी**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
मौलाना आझाद कॉलेज
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

संपुर्ण जगात साठ वर्षापासून यशस्वी लोकशाही जपन्याचं एकमेव श्रेय भारतीय जनतेस आहे. एकशे एकविस कोटी लोकसंख्येचा हा बलाढ्य देश लोकशाही मुल्य अंगीकृत करतो हे आश्चर्यच आहे. इतर लोकशाही म्हणून मिरवणाऱ्या देशांची पुढे कशात परीणती झाली हे आपण पाहिलेलं आहेच. भारतीय लोकशाहीचा कना म्हणजे निवडणूक प्रक्रिया निवडणुक स्थानिक असो अथवा राष्ट्रीय स्तरावरची ती प्रत्येक नागरीकांसाठी महत्वाचीच असते. प्रत्यक्ष मतदान केलेले नसले तरी अप्रत्यक्षरीत्या आपण निवडणूकीशी निगडीत असतोच. सामान्य माणसाच्या जगण्याला प्रभावित करणाऱ्या निवडणूकांविषयी अद्यावत माहिती जाणून घेण्याची प्रत्येकाला आत्यांतिक उत्सुकता असते. निवडणुकांच्या तारखा घोषित होत नाही तोच कोण जिंकून येणार? कोण मागे पडणार? याविषयी तर्क काढले जाता. तज्क्ष राजकीय विश्लेषक असो अथवा सामाण्य मतदार, प्रत्येकजन आपापल्या परीने निवडणूकांच्या निकालाचा भावी आराखडा मनामध्ये तयार करव असतो. याच उत्स्कतेस शास्त्रशुध्द आधार देत निवडणूक अंदाजाची एक अभ्यासपध्दती निर्माण करण्यात आली. ज्यास Psephology निवडणूक अंदाजशास्त्र असे संबोधले जाते. Psephology हा शब्द ग्रीक भाषेतील Psephos या शब्दापासून निर्माण झाला आहे. सिफोज म्हणजे गुळगुळीत गारगोटी. प्राचिन ग्रीक संस्कृतीमध्ये विविध शाखेचे उत्तराधीकारी नेमण्यासाठी निवडणुक होत असे आजच्या निवडणुकांमध्ये ज्या प्रमाणे मत

नोंदविण्यासाठी मतपत्रिकेचा किंवा बॅलेट मशीनचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे सिफोजचा उपयोग केला जात असे अर्थातच ज्या उमेदवाराच्या नावे इतरांपेक्षा जास्त सिफोज आहेत तीच निवडूण येत असे. या सिफोज वरुणच कालांतराने सिफोलॉजी हा शब्द रुढ झाला. सिफोलॉजी शंभर टक्के तंतोतंत अदांजाची समीकरणं मांडणारी अभ्यासशाखा नसली तरीही ती संख्याशास्त्र आणि तांत्रिकरणाच्या पध्दतीद्वारे मतदान आणि निवडणूकी संबंधी विश्लेषन करणारी शास्त्रीय पध्दती आहे. या पध्दतीद्वारे निवडणुक काळातील वेगवेगळ्या राजकीय कृतींचा अभ्यास करुन त्या राजकीय कृतींवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचे एकत्रिकरण करुन निवडणुकीच्या निकाला संदर्भात 'भाकीते' केली जातात. मतदान पुर्वी होणारे सवेक्षण, मत चाचऱ्या शासकीय अहवाल व आकडेवारी याबरोबरच शिक्षण, वय, वर्ग, जात, यांचा मतदान प्रक्रियवर पडणारा प्रभाव या सर्व घटकांचे विश्लेषण करुन मतदार वर्तना संदर्भातील निष्कर्ष या अभ्यासाद्वारे मांडले जातात. ज्यात मतदान पुर्वी, मतदान काळात व मतदाना नंतर किंवा निकाल घोषीत होण्याच्या काही काळापूर्वी घेतलेल्या कल चाचण्यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

निवडणुक अंदाज शास्त्राची शास्त्रोक्त सुरवात अमेरीकेत झाली. मत चाचण्या घेणारी सर्वात जूणी संस्था म्हणजे जॉर्ज गॅलप यांची 'अमेरीकन इस्टीट्युट ऑफ पब्लिक ओपिनियन' १९३५ मध्ये स्थापना झालेली. जन मताचा खरा चेहरा सर्व देशासमोर आणायचा हा त्यांचा प्रारंभीचा मुळ उद्देशः म्हणूनच सुरवातीच्या कल चाचण्यांना राजकीय पक्षांचे प्रायोजकत्व त्यांनी नाकारले. गॅलप पोलला खरी प्रसिध्दी मिळाली ती १९३६ च्या निवडणुकीत फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या अंदाजासाठी. १९३५ पासुन आज पर्यंत ही संस्था व्यापक यशस्वी कल चाचण्या घडवून आणत आहे. एकूण १४० देशांमध्ये अनेकविध विषयांवर पोल्स मांडतात. या कल चाचण्या नेमक्या कशा घडविल्या जातात? तर, अभ्यासक सर्वप्रथम नमुना निवड करुन एकुणच सार्वत्रिक अंदाज बांधण्यासाठी एक विशिष्ट क्षेत्र निवडतो, जे संपुर्ण लोकसंख्येमध्यील प्रातिनिधीक स्वरुपाचे क्षेत्र असते. ठराविक मतदारसंघाच्या मोजक्या मतदान केंद्रावरती काही ठराविक मतदारांच्या मुलाखती घेतल्या जातात. निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी, मतदान नंतर लगेचच अभ्यासक पच ते दहा मतदारांनतर किंवा त्यास योग्य वाटेल अशा निश्चित संख्येनंतर मुलाखत घेऊन कुणास मतदान केले या संबंधी विचारणा करतो. तोंडी

प्रश्नोत्तरास प्रामाणिक प्रतिसाद मिळेलच असे नाही. ही अडचण दूर करण्यासाठी अभ्यासक नमुना मत पत्रिकेचा वापर करतो स्पष्ट बोलून दाखविण्याऐवजी लिहून लोक आपले मत मांडण्यास सुरक्षीत मानतात. या सर्वेक्षणातुन मिळालेली माहिती एकत्र करुन त्याची गणना केली जाते. यातूनच एक गृहितकं चिंत्तारलं जातातं जे या संपूर्ण लोकसंख्येच्या मतास प्रतिबंबीत करत असते. कल चाचण्या प्रत्यक्ष कशा घेतल्या जातात यासाठी उदाहरण म्हणजे, महाराष्ट्र विधानसभा २००९ च्या निवडणुकीत सकाळ या वृत्तपत्राने त्यांची रचना कशी लावली ते पाहुया 'सकाळ माध्यम गृपने' महाराष्ट्रभरातील आठ आकृत्यांमधील १७४२ बातमीदार आणि संपादकीय विभागातील सहकाऱ्यांनी ही पाहनी केली होती.

एकून चार टप्यांमध्ये अंदाज पाहणी घेण्यात आली. प्रत्येक मतदार संघात एक प्रमुख समन्वयक बातमीदार निवडलेला होता. त्या मतदार संघातील बातमीदार आणि समन्वयकांनी मतदार संघाची फेररचना, विविध पक्षांचे उमेदवार, त्यांचा प्रभाव, अपक्ष बंडखोर, मतदारसंघ निहाय उपस्थित झालेले प्रचारातील मुद्द, पुर्वाश्रमीची राजकीय समीकरणे, जात आणि धर्माचा प्रभाव, शिवाय सामान्याचा कल आदीचा कानोसा घेत अंदाज व्येक्त केला. यातून या सर्वेक्षणाची नेमकी कार्यपध्दती समोर येते. या अनेकविध कल चाचण्यातून मिळालेल्या माहितरलीची एकत्रित बांधनी करुन, माताधिक्य कोणाच्या बाजुस आहे हा ढोबळ अंदाज बांधता येता याच मतदानाच्या टक्केवारीचा जागेत अनुमान वर्तविण्याचे काम केले जाते. अर्थात प्रत्येक वेळेस ते अचूक असेल का यात शंका आहे. सर्वच जागांचा वरपांगी अंदाज अचूक असेल म्हणजे उदाहरणादखल महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत २८८ जागांपैकी कॉंग्रेस - राष्ट्रवादीस १४० जागांचा अंदाज वर्तविला प्रत्यक्ष निकालातही १४० जागाच मिळाल्या पण अंदाजातील अभ्यासात प्रत्येक जागेचा विचार करता संबंधीत मतदारसंघात अंदाज वर्तविलेला उमेदवारच निवडून येईल का? हा प्रश्न, प्रश्नच राहाते. भारताचा विचार करता निवडणुक अंदाजशास्त्राचा उपयोग त्याचा अभ्यास वस्तुनिष्टपणे तंतोतंत पध्दतीने होऊ शकत नाही. अर्थात याची बरीच मोठी कारणपरंपरा आहे. त्यातील काही प्रमुख कारणांचा, समस्यांचा विचार येथे करुया. भारतीय निवडणुकात होणारे मतदानाचे अल्पप्रमाण हे अतिशय महत्वाचे कारण आहे. निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या असोत अथवा लोक सभेच्या, मतदानाची टक्केवारी ६० ते ६५ टक्यापर्यंतच थांबते. मतदान मुळात

*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

६० टक्के त्यात मतचाचण्यांच्या वाटण्या किती मतदार येणार? मतदानाची टक्केवारी कमी का? हा विस्ताराने अभ्यासण्याचा प्रश्न आहे. तुर्तास तो आपण बाजुला ठेऊ.

राजकीय हस्तक्षेप हा देखिल महत्वाचा मुद्दा आहे. तसेचही भारतातील निवडणुकांसंबधी होणारे बहुतेक सर्वेक्षणाला राजकीय पक्षाचा वरदहस्त मिळाल्या शिवाय संबंधीत संशोधन पुढे जाऊ शकत नाही. बहुतेक वृत्तवाहीन्य, वृत्तपत्र, संस्था यांना अशा कल चाचण्यासाठी छुपे समर्थन असते. काही ठिकाणी प्रत्यक्ष राजकीय पक्षच या चाचण्या घडवून आणतात. अशा पुर्वग्रहात सापडलेल्या कल चाचण्यांच्याचे भविष्य आपण नजरअंदाज केलेलेच बरे.

भारतातील बहुपक्ष पध्दती - अमेरीका - इंग्लंड सारख्या राष्ट्रांमध्ये मर्यादित पक्ष असल्याने, पक्षा संबंधी मत चाचण्यांची टक्केवारी काढणे सुलभ असते. भारताच्या राजकीय पटलावर एक रात्रीतून नवा पक्ष उदयास येतो. त्यात अपक्ष तर आलाहीदा! २००४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 'चिमुर' मतदार संघात २२ उमेदवार तर २००९ मध्ये औरंगाबाद पुर्व मतदारसंघात २८ उमेदवार उभे होते. अशा ठिकाणी मतांची विभागणी होते. निवडुन येणारा लक्षणीय फरकाने निवडुन येने अवघड असते. अर्थात खरी लढत प्रमुख दावेदारांमध्येच असते. तरीही एवढ्या सर्वच उमेदवारांचा विचार करुन कल चाचण्या घेणे. जिकरीचे ठरते. निवडणुकांच्या फार अगोदर घेतलेल्या मत चाचण्यांच्या अंदजात आणि निकालात फारच तफावत आढळते. मतदारांचा प्राधान्य क्रम हा सतत बदलणारा असतो. मतदारांची आवड किंवा इच्छा असणाऱ्या पक्षासाठीच तो कल देत असतो. जे अभ्यासकासाठी घातक ठरते. मतदारांमधील निरक्षरता किंवा राजकीय सामाजीकरणाचा अभाव हे तर निर्विवाद सत्य आहेच. कारण येथे अभ्यासकास प्रामाणिक प्रतिसाद मिळणे शक्य नसते.

प्रत्यक्ष क्षेत्र कार्य करणारा कायकर्ता यास कल चाचण्या म्हणजे नेमकं काय. याचं गांभीर्य, महत्व जाणून घेऊन निष्टेने काम करणं, माहिती संकलीत करणे खरतर सर्वात जास्त महत्वाचं आहे. आता जबाबदारी दिलीच आहे. तर, ठिराविक वेळेत, ठराविक काम अक्षरशः संपवायचं. वेतनाच्या किंवा मानधनाच्या आकड्याइतकीच श्रमशक्ती खर्च करणाऱ्या अभ्यासकाकडून आपण फार प्रगल्भ, व्यापक, सर्वांगीण आणि सुक्ष्म

*“Knowledge Scholar”*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

माहितीची अपेक्षा करु शकत नाही. अभ्यासकास सामाजिक, मानसशास्त्रीय व मतदान वर्तनुकीशी आधारीत बाबींचा एकत्रित विचार करणे मुल्यमापन करणे आवश्यक ठरते. यासाठीच त्यास गुंतगुंतीच्या सामाजिक घटकांचा जसे लींग, वंश, जाती, शिक्षण समजून घ्यावे लागते. शासनाची लोकप्रियता, राजकीय पक्षांची यशस्वीता आणि पक्ष नेत्यांचा प्रभाव सुध्दा अभ्यासावा लागेल.

ग्रासरुट इन्फॉरमेशन चा पुरेपुर वापर होणे गरजेचे आहे. सर्वे जितका परपांगी, ढोबळ असेल निष्कर्ष तितकाच तकलादु असेल मत चाचण्यांच्या अंदाजाला मतदार फार गांभीर्याने घेत नाहीत असं मानन चुकीचे आहे. राज्य विधानसभा निवडणुकीत मांडलेल्या विविध कल चाचण्यांच्या अंदाजाच्या आपण येथे आढावा घेऊ यातून हे अंदाज कोणी, कधी वर्तविले आणि प्रत्यक्ष निकालाच्या ते किती जवळचे होते ते चित्र स्पष्ट होईल. पश्चिम बंगाल, तामीळनाडू, केरळ, आसाम व पॉंडेचेरी या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीत वर्तविलेल्या अंदाजाचा लेखाजोखा पाहुया ‘मॉ, माटी मानुष’ की जॉय म्हणत चौतिस वर्षाच्या प्रदिर्घ प्रस्तपित सत्तेला ऋणमुल कॉंग्रेसने भुईसपाट केले. ममता बॅनर्जी बंगालच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री बनल्या. तामीळनाडूत भ्रष्टाचाराचा मुद्दा पुढे करत जनतेने मुख्यमंत्री पद अम्मा गळ्यात टाकलं केरळ, आसाम व पॉंडेचरी विधानसभा देखिल निवडणुकांच्या आताषबाजीत चमकुन निघाली. यावरील अंदाजात पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या अंदाज १४ एप्रिल २०११ स्टार न्यूज चॅनलने प्रसिध्द केला.

| TMC+CON | LEFT | BJP | OTH |
|---|---|---|---|
| 215 | 74 | 2 | 3 |

http://www.ksijmr.com

यानंतर २८ एप्रिल २०११ स Exclusive India Today & Headlines Today org. यांचा अंदाज पुढील प्रमाणे.

| State & Party | CON | AGP | BJP | UDF | LDF | DMK | AIADMK |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ASSAM** | 41-47 | 31-35 | 16-18 | | | | |
| **Kerla** | | | | 85-92 | 45-52 | | |
| **Tamilnadu** | | | | | | 115-130 | 105-120 |

10 May 2011 Center for study of developing societies (CSDS) The Week, Manorma News, & CNN-IBN.

| State & Party | TMC | LEFT | DMK | AIADMK | CONG | AGP | AUDF | BJP |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Bangal** | 222-234 | 60-72 | | | | | | |
| **Tamilnadu** | | | 102-114 | 120-132 | | | | |
| **Assam** | | | | | 64-72 | 16-22 | 11-17 | 07-11 |

१० मे २०११ स वृत्तवाहिण्यांनी मांडलेले प.बंगालविषयीचे अंदाज.

| State & Party | Star News | India Today | India Real Time | Samay Live |
|---|---|---|---|---|
| **TMC** | 225 | 210-220 | 210-220 | 181-192 |
| **CPM** | 60 | 65-70 | 65-70 | - |

१० मे २०११ आसाम विधानसभा निवडणुकांचे अंदाज

| Channal Party | CONG | AGP | BJP | UDF | BPF | OTH |
|---|---|---|---|---|---|---|
| **Today Chanakya** | 70-73 | 20-29 | 08-13 | 09-11 | 10-12 | - |
| **Headline today** | 42-48 | 31-33 | 16-18 | 13-15 | 08-10 | 16-19 |
| **C Vatars** | 41-45 | 31-35 | 14-18 | 10-15 | 07-11 | 10-14 |
| **IBN7 CNN** | 65-72 | 16-22 | 07-11 | 11-15 | 10-15 | 12-20 |

१२ मे २०११ स्टार न्युजचा पश्चिम बंगाल विषयी अंदाज

| TMC | CONG | LEFT | OTH |
|---|---|---|---|
| 181 | 45 | 60 | 09 |

याबरोबरच Intoelection यांनी ३ डिसेंबर २०१० मध्ये ऑनलाईन सर्व्हे घेतला होता. त्यात आसाम मधील नागरीकामधील ४८ टक्के लोकांनी बी.जे.पी. साठी तर आय.एन.असी. साठी ३४ टक्के लोकांनी पसंती दिली. ३१ मार्च २०११ इंडीया टुडे यांच्या ऑनलाईन ओपिनियन पोल्स सर्व्हे मध्ये आय.एन.सी. ३२ टक्के ए.जी.पी. २५ टक्के, बी.जे.पी. १२ टक्के, ए.यु.डी. एफ. १६ टक्के लोकांची पसंती होती तर ३७ टक्के लोकांना तरुण

गोगाई पुन्हा मख्यमंत्री बनती अशी खात्री होती. या पाचही राज्यांच्या अंदाज चाचण्यांच्या अभ्यास केल्यास लक्षात येते की, वर्तविलेले अंदाज आणि प्रत्यक्ष निकाल यामध्ये बरीच तफावत आहे. स्टार न्युजने १२ मे २०११ च्या पं. बंगालविषयीचा टी.एम.सी.चा अंदाज तंतोतंत खरा ठरला. डाव्या पक्षांच्या जागेतही २ चा फरक आहे. १० मे २०११ सी.एस.डी.एस. आणि इतर चा टी.एम.सी. चा अंदाज जवळचा होता. एक महत्वाची बाब म्हणजे डी.एम.के आणि ए.आय. डी.एम.के. च्या निकालाजवळ कोनताच अंदाज फिरकला नाही. ऐनवेळी जयललीतांनी कोणती गुगली टाकली हे अंदाजाच्या बाहेर होते. महाराष्ट्र विधानसभा २००९ निवडणुकीचा आढावा घेऊ येथे ७,५८,११,२४५ एकूण मतदार होते तर प्रत्यक्ष निवडणुकीत ६०,३७ टक्के ४,५७,६७,२४८ इतके मतदान झाले यावरील विविध वृत्तवाहीण्यांचे अंदाज पूढील प्रमाणे ७ ऑक्टोंबर २००९ स्टार माझा आणि विल्सन सर्व्हेचा अंदाज

| **पक्ष** | **अंदाज** | **निंकाल** |
|---|---|---|
| **कॉंग्रेस** | ८८ | ८२ |
| **राष्ट्रवादी** | ५२ | ६२ |
| **भाजपा** | ५५ | ४६ |
| शिवसेना | ६३ | ४४ |
| मनसे | ०६ | १३ |
| रिडालोस | १२ | ११ |
| इतर | १२ | ३० |

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

३० ऑक्टोंबर २००९

| पक्ष | सकाळ | स्टार माझा | आय.बी.एन. लोकमत | चिंतत ग्रुप | झी २२४ तास | झी मराठी | द विक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कॉंग्रेस** | ८६ | ८९ | ७५-८० | ८८ | ८० | १७१ | १३५-१५२ |
| **राष्ट्रवादी** | ७१ | ४८ | ५५-६५ | ५४ | ६७ | | |
| **भाजपा** | ५२ | ५१ | ४५-५५ | ५३ | ५० | ८५ | १०२-११८ |
| **शिवसेना** | ४४ | ६२ | ५५-६५ | ५८ | ५५ | | |
| **मनसे** | ०५ | ०५ | ६८-१२ | ०८ | ०७ | १७ | ०८-१६ |
| **रिडालोस** | ०५ | १२ | ५-३५ | २७ | २९ | १५ | १८-२२ |
| **इतर** | २९ | ०५ | | | | | |

२००४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण ६,५९,६६,२९६ मतदार होते, तर मतदान ६३.४१ टक्के ४,१८,२९,२२८ इतके झाले. या निवडणुकीचे वर्तविलेले अंदाज.

२५ सप्टेंबर २००४ अल्फा मराठी तालिम.

| पक्ष | अंदाज | निंकाल |
|---|---|---|
| **कॉंग्रेस - राष्ट्रवादी** | १६३-१६९ | १४० |
| **भाजपा-शिवसेना** | ९८-१०२ | ११६ |
| **इतर** | २२ | ३२ |

१४ ऑक्टोंबर २००४

| पक्ष/वाहिन्या | आजतक | एन.डी.टी.व्ही. | स्टारन्युज | झी न्यूज |
|---|---|---|---|---|
| **काँग्रेस - राष्ट्रवादी** | १४०-१५० | १२०-१३० | १४९ | १२५ |
| **पाजपा - शिवसेना** | १००-११० | १२५-१३५ | ११९ | ११५ |
| **अन्य** | ३०-४० | ३० | २० | ४८ |

१६ ऑक्टोंबर २००४

| **पक्ष/वाहिण्या** | **आजतक** | **एन.डी.टी.व्ही.** | **स्टारन्युज** | **झी न्यूज** | **द.वि.** |
|---|---|---|---|---|---|
| **काँग्रेस - राष्ट्रवादी** | १६५-१७५ | १३२ | १६६ | १३६ | १३९-१४५ |
| **भाजपा - शिवसेना** | ९५-१०५ | १११ | १०० | १२२ | १२६-१३६ |
| **अन्य** | १५-२० | ४५ | २२ | ३० | १०-१७ |

साप्ताहीक महाराष्ट्र

| **पक्ष** | **अंदाज** | **निंकाल** |
|---|---|---|
| **काँग्रेस - राष्ट्रवादी** | १४५ | १४० |
| **भाजपा-शिवसेना** | १०२ | ११६ |
| **अपक्ष** | २१ | १९ |
| **अन्य** | २० | १३ |

http://www.ksijmr.com

वरिल अंदाजाचे विश्लेषण म्हणजे २००९ च्या अंदाजात सकाळने शिवसेने विषयी वर्तविलेला अंदाज १०० टक्के खरा ठरला स्टार माझाने रिडालोस विषयी वर्तविलेल्या अंदाजात एक जागेचा फरक तर झी-२४ तासच्या काँग्रेस राष्ट्रवादीच्या अंदाजात दोन जागेचा फरक आहे. एकूणच अंदाजाच्या विचार केल्यास प्रकर्षाने जाणवते, जवळपास र्सच वाहीन्यांनी काँग्रेस राष्ट्रवादी विषयी वर्तविलेला अंदाज ९८ टक्के खरा ठरला अंदाजांना खरा फटका बसला तो मनसे, रिडालोस आणि इतर पक्षाचा स्टार माझा रिडालोस-१२ सकाळचा इतर पक्ष - २९ व द विकचा मनसे - १६ हे जवळचे अंदाज आहेत. बाकी सर्वच अंदाजकर्ते चुकीचे ठरले.

२००४ च्या कल चाचण्यामध्ये आज तक वाहीनीचे अंदाज निकालाच्या जवळचे तर अल्फा वाहिनीचे अंदाजात जास्तीची तफावत आहे. काही वाहिन्या ठराविक एका निकालाच्या बरेच जवळ तर इतर पक्षासाठी खूपच फरकाच्या आहेत. जसे झी न्युज सेना, भाजपसाठी ११५ जागांचा अंदाज दर्शविते, निकालाच्या जवळ आहे, पण हिच वृत्तवाहिनी काँग्रेस राष्ट्रवादी १२५ व अन्य ४८ जागांचा अंदाज बांधते साप्ताहिक द विक निकाला जवळचा अंदाज काँग्रेस - राष्ट्रवादी १३९-१४५ आहे. तर सेना-भाजप १२६-१३६, अन्य १०-१७ यांची निकालाशी तफावत आहे. आजतक वाहिनीची विशेष बाब अशी की, १४ ऑक्टोंबर चे अंदाज निकालाच्या जवळचे तर दोनच दिवसानंतर वर्तविलेले अंदाज निकालाच्या दुर जातात. या विविध कल चाचण्यावरुन अंदाज आणि निकालाची सांगड आपल्याला घालता येईल. कल चाचण्यांच्या अंदाजाला चिमुटभर मिठाची उपमा दिली जाते. निवडणुकीच्या निकालाची चव अंदाजाशिवाय वाहु शकत नाही. कल चाचण्यांच्या अंदाजाला किती महत्व दयायचे, ते किती विश्वासाहर्य आहेत, किती पारदर्शकपणे माहिती मांडली जाते त्यावरच प्रेक्षकांचा कल असतो केवळ टि.व्ही आर.पी. च्या नावाखाली गोगांट निर्माण करण्यात काही तथ्य नाही. तसंनतसा वृत्तवाहीन्यांचे प्रेक्षपण पाहणारा प्रेक्षक फक्त गंम्मत किंवा टाईम-पास म्हणून बातम्या पाहत नाही.

त्याची मनापासून इच्छा असते जे आपण पाहतोय ते सत्य असावं. म्हणून प्रसार माध्यमांची सुध्दा जबाबदारी आहे की त्यांनी केवळ सत्यच जनतेसमोर आनावं. बी.बी.सी. राऊटर आणि ग्लोब स्कॅन यांच्या मार्फत १० मार्च ते ४ एप्रिल २००६ मध्ये, एकूण दहा राष्ट्रांमध्ये - नाईजेरीया, इंडोनशिया, भारत, अमेरीका, रशिया, इजिप्त, इंग्लंड, दक्षिण कोरीया, ब्राझील व जर्मनी येथे प्रसार माध्यमांची विश्वासार्ह्यता यावर सर्वेक्षण



http://www.ksijmr.com

केले होते. भारतीय जनतेचा ८२ टक्के लोकांचा माध्यमांवर विश्वास आहे राष्ट्रीय आणि प्रांतीय वृत्तपत्रावर विश्वास असणारे ८५ टक्के लोक स्थानिक वृत्तपत्र ७६ टक्के होते. तुमचा विश्वास गमावल्या कारणाने तुम्ही प्रसार माध्यमातून माहिती मिळवणे सोडून द्याल का? या प्रश्नावर केवळ २८ टक्के लोक होय तर ४३ टक्के लोक नाही म्हणाले. चित्र एकूण स्पष्टच आहे.

माहिती मिळवणं बंद होऊ शकत नाही, मिळालेली माहिती अचूक असावी ही अट मात्र कायम राहीलच, हिच गोष्ट कल चाचण्यांच्या अभ्यासकांना सुध्दा लागु आहेच. कल चाचण्यामधून फक्त कोणता पक्ष निवडुण येईल, किती जागा मिळतील एवढीच माहिती मिळते असे नाही. हा अंदाज केवळ जिंकण्या हारण्यापुरता मर्यादित नाही. यातून संबंधीत पक्ष का निवडवुन आला किवां का मागे पडला, याची कारणपरंपरा देखिल स्पष्ट होते. मतदार अमुक पक्षाच्या अमुक एका उमेदवारास मतदान करतो. एवढाच कृत्रिम परीघ येथे नाही. मतदाराच्या वृत्तीचा त्याच्या वर्तनाचा, मानस शास्त्रीय विश्लेषणच कल चाचण्या मांडतात. निवडणुकीशी निगडीत सर्वच बाबींचा सुक्ष्मादिसुक्ष्म अभ्यास येथे होतो. त्यातुन अत्यंत महत्वाची माहिती, आकडेवारी संकलीत होते. मत चाचण्यांमधून व्यक्त झालेला अंदाजच खरा ठरेल असे नाही भाकीता पेक्षा प्रत्यक्ष निकाल वेगळाच असणार आहे यात दुमत नाही, प्रत्यक्ष निलकालाची छोटी प्रतिकृती अंदाजात असते. हा अंदाज सर्वेक्षणात सहभागी असणाऱ्या जनतेचं मत आहे. जे लोक यात समाविष्ट नाही. त्यांच वेगळं मत असणे अपरीहार्यच आहे.

अंदाज निकालासारखच असेल अशी सक्ती करता येणार नाही, पण तसा असावा यासाठी प्रयत्न जरुर हवेत. मी पुन्हा एकदा नमुद करू इच्छिते निवडणुकांची माहिती मिळवणे त्याविषयी जाणून घेणे, आपण ज्यास मतदान केले त्यास इतर लोकही निवडून देऊ इच्छितात का? ही उत्सुकता प्रत्येकामध्ये आहे. तो त्यांच्या केवळ रंजनाचा नव्हे तर जिव्हाळ्याचा देखिल भाग आहे. म्हणून कल चाचण्या फक्त करण्याचा सोपस्कार नको, त्या किती विश्वासाहृर्य आहेत हे देखिल महत्वाचे आहे. मागच्या दशकापासून भारतात निवडणूक अंदाजशास्त्र ही शाखा अगदी विस्कृत झाली आहे. ती तितकीच बिनचुक, शास्त्रोक्त, विश्वासार्ह्य व पारर्शक ठरेल असा अशावादी अंदाज बांधण्यात काहीच हरकत नाही.